गोदातीर समाचार 23/03/2022

# वसरणी येथील खुनाच्या गुन्ह्यातील आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेकडून अटक

गोदातीर स. 23/03/2022



**नवीन नांदेड-** ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील वसरणी भागातील अनोळखी पुरुष जातीच्या मृतदेह आढळून आला. याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती. स्थानिक गुन्हे शाखेने या खून प्रकरणी तीन जणांना अटक केली असून, दोन फरार आरोपींचा शोध घेत आहेत. मयताची ओळख पटली असून या प्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

सोमवार, दि. २१ मार्च रोजी पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण हद्दीत वसरणी येथे एक अनोळखी इसमाचे त्याचे शरीरावर जखमा असलेले प्रेत आढळून आले होते. सदरची माहिती स्थानिक गुन्हे शाखा नांदेडला मिळाल्याने सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून घटनास्थळी स्था. गु. शा. चे डी. जी. चिखलीकर, पोलीस निरीक्षक पी. डी. भारती, स. पो. नि. व स्टाफ यांनी तात्काळ जाऊन घटनास्थळाला भेट दिली व मयताचे फोटो काढून सदर मयताची ओळख पटविण्यासाठी व्हॉटसअॅपव्दारे बातमीदारांना पाठविले. त्यावरुन सदर मयताची ओळख पटली असून, सदर मयताचे नाव गजेंद्र ऊर्फ बिल्टा कैलास ठाकूर वय १७ वर्षे रा. सांगवी, नांदेड असे असल्याचे समजले. त्यानंतर स्था. गु. शा. चे पथकाला यातील मयताचा खून इसम नामे योगेंद्र ठाकूर, सुरेंद्र ठाकूर, निलेश पेनूरकर, चारुदत्त बालाजी वाघमारे यांनी केला असल्याची माहिती गुप्त बातमीदाराकडून मिळाली. त्यावरुन स्थागुशाच्या पथकाने संशयीत आरोपीतांचा शोध घेतला असता योगेंद्र ठाकुर, सुरेंद्र ठाकूर, निलेश पेनूरकर हे तीन आरोपी मिळून आले. **(पान ३ वर...)**

देशोन्नती दि. 24/03/2022



दै. देशोन्नती

क्राइम

# खंजर बाळगणाऱ्यास तामसा पोलिसांनी घेतले ताब्यात

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ विनापरवाना खंजर बाळगणाऱ्यास तामसा पोलिसांनी २२ मार्च रोजी दुपारी ताब्यात घेतले. तामसा ते नांदेड मार्गावरील श्रध्दा बारजवळ मोटारसायकलवर विनापरवाना खंजर तिघेजण बाळगुण जात होते. यावेळी पोलिसांनी तिघांना ताब्यात घेवून त्यांच्याकडून खंजर जप्त केले. या प्रकरणी सपोनि अशोक उजगरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तामसा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

**पोलिसाची मोटारसायकल चोरण्याचा प्रयत्न**

एका पोलिस कर्मचाऱ्याची मोटारसायकल सत्यगणपती मंदिर कमानीसमोरील मार्गावरुन चोरुन नेण्याचा प्रयत्न केल्याची घटना २१ मार्च रोजी रात्री घडली. अर्धापूर ठाण्याचे पोकॉ संदिप पाटील यांची ती मोटारसायकल असून त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अर्धापूर पोलिसांनी तिघांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

**मोटारसायकलची चोरी**

एका तरुणाची मोटारसायकल चोरुन नेल्याची घटना बिलोली शहरात २१ मार्च रोजी रात्री घडली. येथील रहिवाशी चक्रधर तेलंगे यांनी त्यांची मोटारसायकल घरासमोर उभी करुन ठेवली होती. ती चोरट्यांनी लंपास केली.

**ट्रक चोरीला**

किनवट तालुक्यातील सारखणी येथील वजन काटा जवळील ट्रक चोरुन नेल्याची घटना घडली.